# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
# ऑनलाईन गृहपाठ परीक्षा : सूचना

ऑनलाईन गृहपाठ परीक्षा पध्दती २०१७-१८ मध्ये खालील अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांपासून सुरू होत आहे.

- बी.ए. (अर्थशास्त्र / इतिहास / राज्यशास्त्र / समाजशास्त्र / योग)
- एम. ए. (मराठी / इंग्रजी / हिंदी)
- बी.कॉम.
- एम. कॉम.

**ऑनलाईन गृहपाठ परीक्षा पध्दती नेमकी काय आहे ?**

- अशा प्रकारच्या गृहपाठांना ऑनलाईन परीक्षा असेही म्हटले जाते / जाईल. पण मुळात तिचे स्वरूप गृहपाठ असे आहे. त्यामुळे हे काम घरी बसूनही करता येईल किंवा जेथे कॉम्प्युटर व इंटरनेट उपलब्ध आहे अशा कोणत्याही ठिकाणी बसून करता येईल.
- प्रत्येक विषयासाठी एकूण गुण : ४०
- प्रत्येक विषयासाठी प्रत्येकी ४० गुणांचे दोन गृहपाठ
- उत्तीर्णतेसाठी आवश्यक किमान गुण : ४० पैकी १६ (दोन्ही गृहपाठांचे गुण मिळून)
- गृहपाठाचे स्वरूप : ४० गुण, एकूण प्रश्न २०, सर्व प्रश्न वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाचे
- वेळ ४५ मिनिटे
- ***मुख्य म्हणजे गृहपाठांचे हे काम ऑनलाईन म्हणजेच कॉम्प्युटरवर करायचे आहे.***

  **ऑनलाईन गृहपाठ पध्दतीशी संबंधित काहीही काम करण्यासाठी आपल्याला विद्यापीठाच्या खालील वेबपोर्टलवर जाणे गरजेचे आहे. तुमच्या कॉम्प्युटरवर इंटरनेट चालू करून गुगल अथवा अन्य सर्च इंजिनवर खालील पत्ता टाईप करून तुम्ही विद्यापीठाच्या खालीलपैकी कोणत्याही वेबपोर्टलवर जाऊ शकता.**
  **210.212.169.35/StudentExam/ किंवा tmvonline.org/internalexam**

**ऑनलाईन गृहपाठ परीक्षा पध्दतीसाठी आवश्यक गोष्टी**

मित्रांनो, ऑनलाईन गृहपाठ पध्दतीचे सर्व कामकाज विद्यापीठाच्या वेबपोर्टलद्वारे चालणार आहे. त्यामुळे, आपल्याला खालील गोष्टींची गरज आहे.

१. कॉम्प्युटर
२. चांगला स्पीड असलेले इंटरनेट कनेक्शन
३. तुमचा कायम नोंदणी क्रमांक (PRN). या क्रमांकाची तुम्हाला सतत गरज पडणार आहे. तो एक तर पाठ करून ठेवा नाहीतर कुठेही सतत हाताशी राहील अशा ठिकाणी नोंदवून ठेवा.
४. तुमचा स्वतःचा ई-मेल आय.डी.
५. मोबाईल फोन

**प्रायोगिक चाचणी**

प्रायोगिक चाचणी हा ख-या परीक्षेच्या आधीचा महत्त्वाचा टप्पा आहे. तुमची पहिली परीक्षा देण्यापूर्वी विद्यापीठाच्या वेबपोर्टलवर जाऊन प्रायोगिक चाचणी आवर्जून द्या. ख-या परीक्षेच्या वेळी तुम्हाला त्याचा उपयोग होईल. प्रायोगिक चाचणीबाबत खालील गोष्टींची दखल घ्या.

- प्रायोगिक चाचणीतील प्रश्न तुमच्या विषयाशी संबंधित नाहीत.
- प्रायोगिक चाचणी केवळ ऑनलाईन परीक्षा कशी असते याची झलक आहे.
- प्रायोगिक चाचणी ऑनलाईन परीक्षा कशी द्यावी याच्या सरावासाठी आहे.
- प्रायोगिक चाचणीमध्ये प्रश्नांची संख्या मूळ परीक्षेतील प्रश्नांपेक्षा कमीजास्त असू शकते.
- प्रायोगिक चाचणीसाठी दिला जाणारा वेळही कमीजास्त असू शकतो.
- प्रायोगिक चाचणीतून मूळ परीक्षा कशी असेल, ती कशी द्यायची, काय चुका होऊ शकतात, त्या कशा टाळायच्या सगळ्याचा सराव होतो.

**ऑनलाईन गृहपाठ परीक्षाविषयक हस्तपुस्तिका**

ऑनलाईन गृहापाठ परीक्षेची माहिती देणारी हस्तपुस्तिका डाऊनलोड करा.